तरुण भारत
संवाद

# राज्यस्तर कॅम्पसाठी समीक्षा ठाकुरची निवड



**दोडामार्ग :** मुंबई विद्यापीठ एन. एस. एस. विभागामार्फत एस.आर.डी. व एन. आर. डी. निवड चाचणी शिबीर नुकतेच संत राऊळ महाराज महाविद्यालय कुडाळ येथे झाले. या शिबिरातून दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील एन. एस. एस. विभागाची विद्यार्थिनी समीक्षा शशिकांत ठाकुर हिची औरंगाबाद येथे होणाऱ्या १४ ते १६ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय एस. आर. डी. साठी निवड झाली. यासाठी तिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. यू. दरेकर, एन. एस. एस. विभागप्रमुख दिलीप बर्वे, डॉ. आर. एस. इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. दरेकर, चेअरमन अभिजीत हेगशेटये व सर्व पदाधिकाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले. सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी व परिसरातील सर्वांनी तिच्या निवडीबद्दल कौतुक केले आहे.

रविवार, १ सप्टेंबर २०१९

news.sindhu@tbsanwad.com

Scanned by CamScanner